प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400001 फोन/Phone: 022- 22660502

२० फेब्रुवारी, २०२३

## भारतीय रिझर्व बँकेने जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, जळगाव (महाराष्ट्र) वर आर्थिक दंड ठोठावला

भारतीय रिझर्व बँकेने दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या आदेशाद्वारे जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, जळगाव (महाराष्ट्र) वर भारतीय रिझर्व बँकेच्या, तुमचा ग्राहक ओंळखा (के वाय सी) या संदर्भात जारी केलेल्या निर्देशांचे उल्लंघन /पालन न केल्याबद्दल ₹१.५० लाख (केवळ रुपये एक लाख पन्नास हजार) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. उपरोक्त निर्देशांचे पालन करण्यास बँक असमर्थ राहिली हि बाब लक्षात घेता बँकिंग नियमन कायदा, १९४९ च्या कलम ४७ ए (१) (सी) आणि सह वाचलेल्या ४६ (४) (i) व कलम ५६ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीनुसार भारतीय रिजर्व बँकेद्वारे आपल्या अधिकाराचा वापर करीत हा दंड लादण्यात आला आहे.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यामधे बँकेने तिच्या ग्राहकांसोबत केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही.

**पार्श्वभूमी**

३१ मार्च २०२१ रोजीच्या आर्थिक स्तिथीवर आधारित बँकेच्या जोखीम मुल्यांकन तपासणी अहवालात, इतर बाबींसह असे दिसून आले कि बँकेने, भारतीय रिजर्व बँकेद्वारे जारी उपरोक्त निर्देशांचे उल्लंघन / पालन न करता आपल्या ग्राहकांच्या सर्व खात्यांचे जोखीम प्रवर्गात वर्गीकरण केलेले नाही. याच आधारे निर्देशांचे पालन न केल्यामुळे बँकेवर दंड का लादला जाऊ नये याची कारणे दाखवा असे सूचित करणारी नोटीस बँकेला बजावण्यात आली होती.

या बाबतीत बँकेने दिलेले उत्तर, वैयक्तीक सुनावणीच्या वेळी बँकेने सादर केलेले तोंडी निवेदन विचारात घेता भारतीय रिजर्व बँक या निष्कर्षावर पोहोचली कि भारतीय रिझर्व बँकेच्या निर्देशांचे पालन न केल्याचे सिद्ध होते आणि आर्थिक दंड लावले जाने आवश्यक आहे.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाप्रबंधक

**प्रेस प्रकाशनी: 2022-2023/1749**